**<u>विशेष दिवाणी दावा क्र. १७५/२०२३ मध्ये निशाणी क्र. १६ कडील अर्जावर आदेश.</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६, नियम १७ मधील तरतुदीनुसार वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२) वादी हे प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाद्वारे वादपत्राच्या परिच्छेद क्र. ८ मध्ये पोट परिच्छेद समाविष्ट करुन त्यामध्ये प्रतिवादीच्या नावे असलेल्या मौजे विरवडे, ता. कराड येथील मिळकतींबाबतचा तपशील नमूद करु इच्छीत आहेत.

३) प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याबाबत प्रतिपक्षास आदेशित केले आहे. परंतु प्रतिवादीने या अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत केला आहे.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी प्रतिवादीला व त्यांच्या विद्वान वकीलांना वारंवार पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर प्रतिवादीतर्फे युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) वादी हे या अर्जाच्या कामी “AIR 1985 Supreme Court 817, Vineet Kumar Vs. Mangal Sain Wadhera” या आदरणीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर व तसेच “AIR 1978 Goa, Daman and Diu 23, Bill Roynald Carneiro Vs. Mrs. Anunciacao D'Souza Carneiro” या आदरणीय गोवा, दमण व दिव ज्युडिशिअल कमिशनर्स कोर्ट या न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर विसंबून राहिले आहेत. मी उपरोक्त

न्यायनिवाड्यांचे अवलोकन केले.

६) वादींच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुद्ध रक्कम वसूल करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादींनी वादपत्राच्या परिच्छेद क्र. ८ मध्ये वादींची रक्कम वसुल करुन मिळण्यासाठी प्रतिवादीची चल व अचल संपत्ती विक्री करुन मिळणे आवश्यक असल्याबाबत कथन केले आहे. वादी हे प्रस्तुत दावा दुरुस्तीच्या अर्जाद्वारे वादपत्राच्या परिच्छेद क्र. ८ मध्ये पोट परिच्छेद समाविष्ट करुन त्यामध्ये प्रतिवादीच्या नावे असलेल्या मौजे विरवडे, ता. कराड येथील मिळकतींबाबतचा तपशील नमूद करु इच्छीत आहेत. वादींनी निशाणी क्र. १९ कडील यादीसोबत प्रतिवादींच्या नावे असलेल्या मिळकतींचे गाव नमुना ६ व ७/१२ चे उतारे दाखल केले आहेत. प्रकरणाचे स्वरूप विचारात घेता व अर्जातील नमूद कारणांचा विचार करता व उपरोक्त न्यायनिवाड्यांमध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालयाने व आदरणीय गोवा, दमण व दिव ज्युडिशिअल कमिशनर्स कोर्ट या न्यायालयाने व्यक्त केलेले मत विचारात घेता माझ्या मते वादी हे प्रस्तुत अर्जाद्वारे त्यांच्या वादपत्रामध्ये करु इच्छीत असलेली प्रस्तावीत दुरूस्ती ही प्रस्तुत दाव्यातील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादी करु इच्छीत असलेल्या प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. त्यामुळे वरील नमूद सर्व कारणांचा विचार करता माझ्या मते वादींनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज समर्थनीय आहे व तो मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१) प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२) वादींनी प्रस्तुत अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती त्यांच्या वादपत्रामध्ये या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत करावी व त्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसण्याचा आहे.

४) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.08.21 17:39:11 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांकः– २१/०८/२०२६ सह दि. न्या. व. स्तर, कराड.